सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १२/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार दि.१९/०१/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०४/०१/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महापालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.३ मधील लोंढे कॉलनी येथील मनपा ओपनस्पेस मध्ये महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेत येत असलेल्या चिल्ड्रन पार्कला " **कै. सागर आवटी चिल्ड्रन पार्क** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे. **उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

३. महापालिका क्षेत्रातील मिरज ते टाकळी रस्त्यावरील स.नं.१८३/१ क्षेत्र हे ०.५९ आर इतके क्षेत्रातील कॉलनीस " **झुलेलाल कॉलनी** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे. **उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

४. महापालिका क्षेत्रातील मिरज ते कृष्णाघाट कडे जाणाऱ्या रस्त्यास रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्ग ज्या ठिकाणी क्रॉस होतो त्या ठिकाणच्या चौकास " **लक्ष्मी चौक** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे. **उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

५. महापालिका क्षेत्रात महानगरपालिका व आयुष सेवा भावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग तपासणीसाठी विधान परिषदेचे सदस्य आमदार डॉ.प्रा.मनिषा कायंदे यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून मोबाईल क्लिनीक व्हॅन खरेदीकामी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

६. आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत सांगली शेरीनाला येथील पंपासाठी प्लॅटफॉम बांधणे व याकामी येणारे खर्चास मान्यता देणे **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.११/०१/२०२४ चे विषयपत्र.**

७. आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत मिरज कृष्णा घाट जॅकवेल येथे नविन क्लि.सी.बी.रुम व ट्रान्स्फॉर्मर याई उंची वाढवून उभे करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणे. **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.११/०१/२०२४ चे विषयपत्र.**

८. महापालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता Turn Table Ladder ५५ मिटर उंच वाहनाच्या खरेदीसाठी आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे प्रशासकीय मन्यता व निधी मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देणे. **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

९. महापालिकेच्या आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सुधारित दराने लागू करणेस मान्यता देणे. **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१८/०१/२०२४ चे विषयपत्र.**

१०. महापालिका क्षेत्रातील अग्निशमन ना-हरकत दाखल/अंतिम आग संरक्षक मान्यता (Final Fire Safety Approval) प्रमाणपत्रांचे वार्षिक नुतणीकरण थांबविणे / रद्द करुन ज्यांना आवश्यक आहे त्यांना नुतणीकरण करुन देण्याबाबत मान्यता देणे. **उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

११. महापालिका क्षेत्रातील मिरज शहरातील मध्यवर्ती निदान केंद्राचे इमारतीचे अनुषंगिक दुरूस्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रीतसर जाहीर निविदा प्रसिध्द करुनई टेंडर या संकेतस्थाळावर निविदा प्रसिध्द करुन खुल प्रवर्ग यांचेकडून निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजपत्रकीय र.रु.५४,३१,४९१/- मात्रचे खर्चास व निविदा प्रसिध्दीचे खर्चास मान्यता देणे. **उपायुक्त (बांधकाम विभाग, मिरज.) यांचे दि.१७/०१/२०२४ चे विषयपत्र.**

१२. महापालिका हद्दीमधील मौ. मिरज, ता.मिरज, जि.सांगली येथील भूमापन क्रं.९४९अ/४/१ब या जागेवरील आरक्षण क्रं.३७८-प्राथमिक शाळा व क्रिडांगण, क्षेत्र २२५० चौ.मी. या आरक्षण जागेचे भुसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणे. **उपायुक्त (नगररचना विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४ दिनांक :- १९/०१/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१२ दि.१९/०१/२०२४ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दुपारी ०४.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.राहुल रोकडे - उपायुक्त,सांगली
३.	श्री.पंडीत पाटील – उपायुक्त, मालमत्ता कर व इतर	४.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त, मालमत्ता व्यवस्थापन
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.मेंगडे – मुख्य लेखाधिकारी
७.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी (वैद्य.सेवा)	८.	श्री.रविंद्र ताटे - वैद्यकिय आरोग्याधिकारी (आरोग्य)
९.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	१०.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी
११.	श्री.अशोक माणकापुरे – प्रशासकीय अधिकारी	१२.	श्री.परमेश्वर हलकुडे - नगर अभियंता, सांगली.
१३.	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३	१४.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
१५.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली	१६.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
१७.	श्री. अमरसिंह चव्हाण – विद्युत अभियंता	१८.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
१९.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक	२०.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर
२१.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२२.	श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क अधिकारी / विधी वि.अधि.
२३.	श्री. सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी पा.पु.	२४.	

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०४/०१/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महापालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.३ मधील लोढे कॉलनी येथील मनपा ओपनस्पेस मध्ये महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेत येत असलेल्या चिल्ड्रन पार्कला " **कै. सागर आवटी चिल्ड्रन पार्क** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०३	महापालिका क्षेत्रातील मिरज ते टाकळी रस्त्यावरील स.नं.१८३/१ क्षेत्र हे ०.५९ आर इतके क्षेत्रातील कॉलनीस " **झुलेलाल कॉलनी** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०४	महापालिका क्षेत्रातील मिरज ते कृष्णाघाट कडे जाणाऱ्या रस्त्यास रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्ग ज्या ठिकाणी क्रॉस होतो त्या ठिकाणच्या चौकास " **लक्ष्मी चौक** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर

विषय क्र. ०५	महापालिका क्षेत्रात महानगरपालिका व आयुष सेवा भावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग तपासणीसाठी विधान परिषदेचे सदस्य आमदार डॉ.प्रा.मनिषा कायंदे यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून मोबाईल क्लिनीक व्हॅन खरेदीकामी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. ०६	आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत सांगली शेरीनाला येथील पंपासाठी प्लॅटफॉम बांधणे व याकामी येणारे खर्चास मान्यता देणे
विशेष कार्य.अधिकारी	मा.शासनाकडे निधी मागणी करणेचा प्रस्ताव आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. ०७	आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत मिरज कृष्णा घाट जॅकवेल येथे नविन व्हि.सी.बी.रुम व ट्रान्स्फॉर्मर यार्ड उंची वाढवून उभे करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणे.
विशेष कार्य.अधिकारी	मा.शासनाकडे निधी मागणी करणेचा प्रस्ताव आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. ०८	महापालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता Turn Table Ladder ५५ मिटर उंच वाहनाच्या खरेदीसाठी आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे प्रशासकीय मन्यता व निधी मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देणे.
अग्निशमन अधिकारी	मा.शासनाकडे निधी मागणी करणेचा प्रस्ताव आहे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. ०९	महापालिकेच्या आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सुधारित दराने लागू करणेस मान्यता देणे.
प्रशासन अधिकारी आस्था.	कायम कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देणेस यापूर्वी तत्वत: मान्यता मिळालेली आहे. सविस्तर अहवाल सादर केला आहे.
प्रशासक	किती कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे.
प्रशासन अधिकारी आस्था.	एकूण १३९३ कर्मचारी व खर्च र.रु.१३,५५,०४८/- प्रती महिना.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र. १०	महापालिका क्षेत्रातील अग्निशमन ना-हरकत दाखल/अंतिम आग संरक्षक मान्यता (Final Fire Safety Approval) प्रमाणपत्रांचे वार्षिक नुतणीकरण थांबविणे / रद्द करुन ज्यांना आवश्यक आहे त्यांना नुतणीकरण करुन देण्याबाबत मान्यता देणे.
अग्निशमन अधिकारी	महासभा ठराव आहे दि.३१ डिसेंबर, पूर्वी नुतणीकरण करणेबाबत व सन २०१४ चे शासकीय पत्र आहे. त्यानुसार आस्थापनांची मागणी आहे.
प्रशासक	बी फॉर्म कधी घेता ?
अग्निशमन अधिकारी	जानेवारी व जुलै महिन्यामध्ये घेतली जातात.
प्रशासक	बी फॉर्म दिला नाही तर काय कारवाई करता ?
अग्निशमन अधिकारी	बी फॉर्म शासनमान्य एजन्सी देते व मालक आपल्याकडे देतो.
प्रशासक	नुतणीकरण बंद करण्यात यावे. परंतू ज्या आस्थापना बी फॉर्म वेळेत जमा करत नाहीत त्यांचेवर आस्थापना सील करणे अथवा कायदेशीर कारवाई करणेत यावी.
विषय क्र. ११	महापालिका क्षेत्रातील मिरज शहरातील मध्यवर्ती निदान केंद्राचे इमारतीचे अनुषंगिक दुरूस्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रीतसर जाहीर निविदा प्रसिध्द करुनई टेंडर या संकेतस्थाळावर निविदा प्रसिध्द करुन खुल प्रवर्ग यांचेकडून निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजपत्रकीय र.रु.५४,३१,४९१/- मात्रचे खर्चास व निविदा प्रसिध्दीचे खर्चास मान्यता देणे.
उपायुक्त	एस्टीमेट जास्त वाटत आहे.
शहर अभियंता	एस्टीमेट मध्ये फर्निचर, इंटिरियर सह सर्व खर्च धरला आहे. तसेच पुढे शेड ही धरले आहे.
प्रशासक	प्लॉन नगररचना विभागाकडून तपासुन घेणे.

शहर अभियंता	या अनुषंगाने माझी एक उपसूचना आहे. केंद्र शासनाच्या धोंडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना सन २०२३-२४ भाग-१ विशेष योजनातील कामाच्या वर्क ऑर्डर निधी प्राप्त झाल्यानंतर देणेची अट शिथील करण्यात यावी.
प्रशासक	उपसूचनेसह विषय मंजूर.
विषय क्र. १२	महापालिका हद्दीमधील मौ. मिरज, ता.मिरज, जि.सांगली येथील भूमापन क्रं.९४९अ/४/रब या जागेवरील आरक्षण क्रं.३७८-प्राथमिक शाळा व क्रिडांगण, क्षेत्र २२५० चौ.मी. या आरक्षण जागेचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणे.
नगररचनाकार मिरज.	शासनाने खरेदी सूचना कायम केलेली आहे व एक वर्षाच्या आत भूसंपादनाची कार्यवाही करणेची निर्देश दिलेले आहेत.
प्रशासक	खाजगी वाटाघाटीने भूसंपादन किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- १९/०१/२०२४

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६४ **दिनांक :- १९/०१/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०४/०१/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४६ ते ६३ चे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६५ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.३ मधील लोंढे कॉलनी येथील मनपा ओपनस्पेस मध्ये महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेत येत असलेल्या चिल्ड्रन पार्कला " **कै. सागर आवटी चिल्ड्रन पार्क** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेत येत आहे

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६६ **दिनांक :- १९/०१/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील मिरज ते टाकळी रस्त्यावरील स.नं.१८३/१ क्षेत्र हे ०.५९ आर इतके क्षेत्रातील कॉलनीस " **झुलेलाल कॉलनी** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६७ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग, मिरज.) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील मिरज ते कृष्णाघाट कडे जाणाऱ्या रस्त्यास रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्ग ज्या ठिकाणी क्रॉस होतो त्या ठिकाणच्या चौकास " **लक्ष्मी चौक** " असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणे येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६८ **दिनांक :-** १८/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रात महानगरपालिका व आयुष सेवा भावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग तपासणीसाठी नवीन मोबाईल क्लिनीक व्हॅन खरेदी व त्यावर फॉब्रिकेटेड बॉडी बांधणे, कलर, इटिरियर, रजिस्ट्रेशन, इन्शुरन्स इत्यादी अनुषंगिक खर्चासह र.रु.४० लक्ष खर्च अपेक्षित असून त्यासाठी विधान परिषदेचे सदस्य आमदार डॉ.प्रा.मनिषा कायंदे यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खरेदीची प्राथमिक मान्यता मिळाले नंतर ई-निविदा मागवून वाहन खरेदी करण्यास व त्याकामी प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ६९ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.११/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत सांगली शेरीनाला येथील पंपासाठी प्लॅटफॉम बांधणेकामी अंदाजपत्रकीय र.रु.१,३२,४८,८१०/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून सदरचा प्रस्ताव आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत राष्ट्रीय व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार तयार करणेत आलेले आहे त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा.शासनाकडून आपत्ती सौम्यीकरण योजने अंतर्गत निधी मंजूरीसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे मार्फत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७० **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.११/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत मिरज कृष्णा घाट जॅकवेल येथे नविन व्हि.सी.बी.रुम व ट्रान्स्फॉर्मर यार्ड उंची वाढवून उभे करणे अंदाजपत्रकीय र.रु.१,४४,५४,०००/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून सदरचा प्रस्ताव आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत राष्ट्रीय व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार तयार करणेत आलेले आहे त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा.शासनाकडून आपत्ती सौम्यीकरण योजने अंतर्गत निधी मंजूरीसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे मार्फत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जलनि:सारण अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७१ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता Turn Table Ladder ५५ मिटर उंच वाहनाच्या खरेदीसाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालय, मुंबई यांचे T.T.L. चे तपशिल पत्र प्रमाणे अंदाजपत्रकीय र.रु.२१,०८,२७,५४७/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून सदरचा प्रस्ताव आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत राष्ट्रीय व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार तयार करणेत आलेले आहे त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मा.शासनाकडून आपत्ती सौम्यीकरण योजने अंतर्गत निधी मंजूरीसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे मार्फत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्य अग्निशमन अधिकारी -

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७२ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१८/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिकेच्या आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सुधारित दराने लागू करणेस सर्वसाधान प्रशासक सभा क्र.०८ ठराव क्र.२९ दि.२८/११/२०२३ अन्वये तत्वत: मान्यता देण्यात आलेली होती व सदर भत्ता लागू केल्यास त्याबाबतचा कर्मचारी निहाय अहवालाची मागणी प्रशासनाकडून करण्यात आलेली होती. त्यानुसार प्रशासनाकडून सविस्तर अहवाल सादर करण्यात आला असून त्यास ही सभा सहमती दर्शवित असून प्रस्तावानुसार महापालिकेच्या कायम कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता लागू करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन अधिकारी (अ.क्षे.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७३ **दिनांक :- १९/०१/२०२४**

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (अग्निशमन विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील अग्निशमन ना-हरकत दाखल/अंतिम आग संरक्षक मान्यता (Final Fire Safety Approval) प्रमाणपत्रांचे वार्षिक नुतणीकरण थांबविणे / रद्द करुन ज्यांना आवश्यक आहे त्यांना नुतणीकरण करुन देणे बाबत अग्निशमन विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार अग्निशमन विभागाकडून देण्यात येणारे ना-हरकत दाखले/ अंतिम आग संरक्षक मान्यता शासन स्तरावरुन नुतणीकरण करुन घेणे बंधनकारक करण्यात येत नाही तो पर्यत नुतणीकरण करुन देण्याची प्रक्रिया थांबविणेस मान्यता देण्यात येत असून ज्यांना आवश्यकता असेल त्यांना आवश्यकतेनुसार नुतणीकरण फी भरुन घेवुन नुतणीकरण करुन देण्यास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ मधील तरतूदीनुसार मालक, भोगवटादार यांनी त्यांचे इमारतीत केलेल्या आग प्रतिबंधक उपाययोजना दुरुस्त व कार्यक्षम असल्याचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांचेकडून अधिकृत एजन्सी धारक यांचेकडील प्रमाणपत्र बी वर्षातून दोन वेळा जानेवारी व जुलै महिन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक असून त्यानुसार पुर्तता न करणाऱ्या मालक, भोगवटादार यांचेवर अग्निशमन अधिकारी यांनी आस्थापना सिल करणे यासह कठोर कायदेशीर कारवाई करावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्य अग्निशमन अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७४ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग, मिरज) यांचे दि.१७/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील मिरज शहरातील मध्यवर्ती निदान केंद्राचे इमारतीचे अनुषंगिक दुरूस्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रीतसर जाहीर निविदा प्रसिध्द करुनई टेंडर या संकेतस्थाळावर निविदा प्रसिध्द करुन खुल प्रवर्ग यांचेकडून निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजपत्रकीय र.रु.५४,३१,४९१/- मात्रचे खर्चास व निविदा प्रसिध्दीचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी येणार खर्च विषयपत्रात नमुद लेखाशिर्षातून होणेचा आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने शहर अभियंता यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना सन २०२३-२४ भाग-१ विशेष योजना अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी मधून एकूण १० प्रकारची विकासकामे करण्यास निविदा मागविणेस मा.सर्वसाधारण प्रशासक ठराव क्र.४४ दि.१९/१२/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. सदर ठरावामध्ये निविदा मागविल्या नंतर कामाची वर्कऑर्डर ही मनपाचे खातेवर PFMS द्वारे निधी वितरीत झाले नंतर देणेची अट घालण्यात आलेली आहे. सध्या प्रस्तावित १० कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून सदरकामी केंद्र शासनाचा निधी महापालिकेस मंजूर झालेला आहे सदरचा निधी हा दि.३१ मार्च, २०२४ पूर्वी खर्च करणे आवश्यक असलेने व थोड्याच दिवसांत लोकसभा निवडणूक २०२४ ची आचारसंहीता लागण्याची शक्यता असलेने मंजुर झालेला निधी मुदतीत खर्च होण्याच्या दृष्टीने ठराव क्र.४४ मधील वर्क ऑर्डर देण्याबाबतची अट शिथील करण्यात येत असून सदर कामाचे मंजुर ठेकेदार यांना वर्क ऑर्डर देण्यास मान्यता देणेत येत आहे.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७५ **दिनांक :-** १९/०१/२०२४

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०१/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका हद्दीमधील मौ. मिरज, ता.मिरज, जि.सांगली येथील भूमापन क्रं.९४९अ/४/१ब या जागेवरील आरक्षण क्रं.३७८-प्राथमिक शाळा व क्रिडांगण, क्षेत्र २२५० चौ.मी. या आरक्षण जागेचे वटमुखत्यार धारक श्री.सलीम निजाम सनदी व इतर यांनी मा.शासनावर खरेदी सुचना बजावलेली होती. त्यावर मा.संचालक नगररचना तथा सह सचिव यांचे दालनामध्ये सुनावणी होवुन सदरची खरेदी सुचना दि.१०/०४/२०२३ रोजी कायम झालेली असून दि.०९/०४/२०२४ पूर्वी आरक्षणाखालील जमीनीच्या भूसंपादनाची कार्यवाही सुरु करावी असे आदेश झालेले आहेत. त्यानुसार श्री.सलीम निजाम सनदी वटमुखत्यार व इतर खाजगी मिळकत धारकांनी मा.शासनावर दि.१२/०४/२०२३ रोजी कलम १२७ नुसार खरेदी सुचना बजावलेली आहे. त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही मुदतीत करावी असे मा.शासनाने कळविले आहे. भूसंपादन करण्याच्या आरक्षीत जागेचे भूसंपादन कायद्यातील तरतुदी नुसार सन २०२३-२४ बाजार मुल्य दर तक्त्यानुसार र.रु.२,६९,५०,५००/- अथवा भूसंपादनाच्या अंतिम निवाड्याची रक्कम द्यावी लागणार आहे. सबब, मा.शासन निर्णयानुसार विषयातील आरक्षणा खालील क्षेत्र अर्जदार यांचेशी खाजगी वाटाघाटी करुन भूसंपादन करणे अथवा जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स.ल.ठ.र.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका